वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील संस्थेत Mechanized Cleaning Services बाह्यस्त्रोत सेवापुरवठादाराकडून घेण्यास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वैशिवि-२०२३/प्र.क्र.२५७/प्रशा-२**
९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मंत्रालय - ४००००१
तारीख: ०९ ऑक्टोबर, २०२४

वाचा -

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय भाग-२, दिनांक १७.०४.२०१५
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पू.क., दिनांक २७.०४.२०२२
३. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. वैशिवि-२०२३/प्र.क्र.२५७/ प्रशा-२, दिनांक १९.१२.२०२४
४. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. वैशिवि-२०२३/प्र.क्र.२५७/ प्रशा-२, दिनांक १९.१२.२०२३
५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांच्या पत्र क्र.डीएमईआर १५०३/२०२४-O/O- Commissioner/११०३२३/ दिनांक ०३.०६.२०२४
६. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय क्र.वैशिवि-२०२३/प्र.क्र.२५७/प्रशा-२, दिनांक १२.०७.२०२४
७. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन क्र. संकीर्ण -०६२४/प्र.क्र.२८६/प्रशा-२, दिनांक ०४.१०.२०२४
८. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांचे पत्र क्र. संवैशिवसं/यंसाख/निविदा स्वीकृती/१४३६४/२०२४, दिनांक ०७.१०.२०२४

प्रस्तावना -

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील ७७ शासकीय वैद्यकीय/ आयुर्वेद/ दंत/ होमिओपॅथी/ परिचर्या महाविद्यालय व व रुग्णालयांत बाह्ययंत्रणेद्वारे Mechanized Cleaning Services उपलब्ध करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी दिनांक १९.१२.२०२३ रोजीच्या संदर्भ क्र.३ वरील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. २४४५/२४ मध्ये दिनांक १४.०३.२०२४ रोजीच्या न्याय निर्देशान्वये दिनांक १९.१२.२०२३ रोजीचे प्रशासकीय मान्यतेचे शासन निर्णय व त्यानुसार राबविलेली निविदा प्रक्रिया रद्द ठरविली होती. सदर न्यायालयीन प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेल्या सूचना अंतर्भूत करुन आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांना संचालनालयस्तरावर निविदा प्रक्रिया राबविण्यास विभागाच्या दिनांक १२.०७.२०२४ रोजीच्या संदर्भ क्र. ५ वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार संचालनालय स्तरावर प्रसिध्द

केलेल्या ई - निविदाअंती १)मे. स्मार्ट सर्विसेस प्रा.लि., २) मे. बीवीजी इंडिया लि. ३) मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्विसेस लि. हे ३ निविदाधारक पात्र ठरले आहेत. सदर पात्र निविदाधारकांपैकी मे. स्मार्ट सर्विसेस प्रा.लि. या सेवापुरवठादाराने न्युनतम स्वच्छता दर सादर केले आहेत. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील ७७ शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद/ दंत/होमिओपॅथी/परिचर्या महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांच्या बांधीव व खुल्या परिसराची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता हे काम बाह्ययंत्रणेद्वारे तांत्रिक पध्दतीने (Mechanized Cleaning Services) राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये अधिनस्त ७७ शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद/दंत/होमिओपॅथी/ परिचर्या महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांत बाह्ययंत्रणेद्वारे Mechanized Cleaning Services सुरु करण्याकरिता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष यांनी संदर्भ क्र. ७ वरील दिनांक ०७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे निविदाअंती पात्र निविदाधारकांना मे. स्मार्ट सर्विसेस प्रा.लि. या एल १ सेवा पुरवठादाराने सादर केलेल्या न्युनतम दराप्रमाणे पुरवठा आदेश विभागून देण्यास व त्याकरीता येणा-या अंदाजित वार्षिक खर्च रु.२४८,५२,६३,१४४/- (रुपये दोनशे अठ्ठेचाळीस कोटी बावन्न लाख त्रेसष्ठ हजार एकशे चौव्वेचाळीस फक्त) (जी.एस.टी कर वगळून) प्रशासकीय मान्यता प्रदान देण्यात येत आहे.

२. वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय अधिनस्त संस्थेचे अंदाजित क्षेत्रफळ, विनावापर असलेल्या जागेचे क्षेत्रफळ विचारात घेवून, बांधीव क्षेत्रफळाकरीता रु. १२१.००/- प्रति चौरस मिटर प्रती महिना या प्रमाणे व खुल्या क्षेत्रफळाकरीता रु. १२.००/- प्रति चौरस मीटर प्रति महिना या दराप्रमाणे Mechanized Cleaning Services चे कामे खालील प्रमाणे विभागून देण्यात येत आहे.

| निविदाकारांचे नाव | मे. स्मार्ट सर्विसेस प्रा.लि. (L१) | मे. बीवीजी इंडिया लि. (L२) | मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्विसेस लि. (L३) |
|---|---|---|---|
| कार्यालयाचे ठिकाण | १) अकोला<br>२) अलिबाग<br>३) मुंबई<br>४) बारामती<br>५) छत्रपती संभाजीनगर<br>६) चंद्रपुर<br>७) धाराशिव<br>८) धुळे<br>९) गोंदिया<br>१०) हिंगोली<br>११) जळगाव | १) अंबाजोगाई<br>२) सांगली<br>३) सावनेर<br>४) शिरुर<br>५) सोलापूर<br>६) यवतमाळ | १) मिरज<br>२) नागपूर |

| | | | |
|---|---|---|---|
| | १२) कोल्हापुर<br>१३) लातुर<br>१४) नांदेड<br>१५) नंदुरबार<br>१६) परभणी<br>१७) पालघर<br>१८) पुणे<br>१९) सातारा<br>२०) सिंधुदुर्ग<br>२१) ठाणे | | |

उक्त विवरणपत्रात नमूद कार्यालयाच्या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालय/रुग्णालय/आरोग्य पथक इत्यादी ज्या संस्था कार्यरत आहेत त्या रुग्णालयांमध्ये Mechanized Cleaning Services सेवा संबंधित सेवापुरवठादारमार्फत उपलब्ध करुन घेण्यात यावेत.

३. उपरोक्त शासन मान्यता खालील अटी व शर्तीचे पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांची राहील : -

अटी व शर्ती :-

(१) ज्या महाविद्यालये/रुग्णालयांमध्ये नियमित सफाईगार कार्यरत आहे, अशा संस्थेत नियमित उपलब्ध असलेल्या सफाईगार कर्मचा-यांची संख्या विचारात घेवून संबंधित संस्थाच्या अधिष्ठाता यांनी या नियमित सफाईगाराकडून साफसफाईकरीता बांधीव/खुले क्षेत्र आरक्षित करुन घ्यावे. आरक्षित केलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रासाठी Mechanized पध्दतीने स्वच्छता सेवा उक्त पुरवठादाराकडून उपलब्ध करुन घेण्यात यावी व त्यानुसार त्यांची देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच, सर्व संस्थेतील Mechanized पध्दतीने स्वच्छता करीता निश्चित केलेल्या क्षेत्रफळ संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ०६ महिन्याचे आत प्रमाणित करुन संचालनालय यांना सादर करावे.

(२) सदर कामाची कालावधी (RFP मधील Clause २.३) प्रमाणे असेल. तसेच, आवश्यकतेनुसार एक महिन्याची नोटीस देऊन कधीही (anytime) बंद करण्याचे आदेश देता येतील.

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय दिनांक १२/०७/२०२४ अन्वये नवीन शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद/दंत/होमिओपॅथी/परिचर्या महाविद्यालय व रुग्णालय निर्माण झाल्यास वाढीव काम वाटपाचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांना प्रदान करण्यात आले आहेत. तथापि, आता पुरवठादार निश्चित झाले असल्याने परिच्छेद २ मध्ये नमूद कार्यालयाव्यतीरिक्त नविन ठिकाणी संस्था निर्माण झाल्यास एल १ पुरवठादाराला प्राथम्याने देण्यात यावे.

(४) विभागाच्या अधिपत्याखालील ज्या संस्थेत संचालनालयस्तरावर राबविण्यात आलेल्या एकत्रित निविदा प्रक्रियाअंती बाह्यस्त्रोत सेवापुरवठादारामार्फत कंत्राटी पदे उपलब्ध करुन घेण्यास दिनांक ०४/१०/२०२४ रोजीच्या संदर्भ क्र. ६ वरील शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. तरी उक्त शासन निर्णयानुसार ज्या संस्थेने कंत्राटी सफाईगार पदे बाह्यस्त्रोतामार्फत उपलब्ध केले असतील तिथे Mechanized Cleaning Services घेतल्यास स्वच्छता कामाची दुरुक्ती होणार नाही याची दक्षता संबंधित अधिष्ठाता यांनी घ्यावी. तसेच, ज्या संस्थेत बाह्यस्त्रोताद्वारे Mechanized Cleaning Services ची सेवा उपलब्ध केली आहे वा करण्यात आल्यानंतर त्या संस्थांनी सदर सफाईगार पदे उपलब्ध करुन घेऊ नये अथवा घेतलेले असल्यास त्या सेवा संपुष्टात आणण्यात याव्यात.

(५) Mechanized Cleaning Services करीता आवश्यक मनुष्यबळ यांना बाह्यस्त्रोत सेवापुरवठादाराने, शासनाने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे किमान वेतन व कायदेशीर दायित्व (Statutory Liabilities) उदा. भविष्यनिर्वाह निधी, ईएसआयसी, बोनस, लेबर वेलफेअर फंड, रजा रोखीकरण इ. भत्यांची तसेच, वेळोवेळी जर लागू असलेल्या करांची अदायगी करणे बंधनकारक राहील.

(६) संचालनालय अधिनस्त ज्या संस्थेत सद्यस्थितीत विविध बाह्यस्त्रोत सेवापुरवठादारांकडून पुरविण्यात येत असलेल्या स्वच्छता सेवाची मुदत संपली आहे अश्या बाह्यस्त्रोत सेवापुरवठादांची सेवा संपुष्टात आणावी व या शासन निर्णयाद्वारे निश्चित केलेल्या सेवापुरवठादारांकडून Mechanized Cleaning Service उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांनी करावी.

(७) शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद/दंत/होमिओपॅथी/परिचर्या महाविद्यालय व रुग्णालयात Mechanized पध्दतीने स्वच्छता सेवाकरीता आरक्षित केलेला क्षेत्रफळ कमी किंवा वाढ करण्याचा अधिकार संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता यांना राहील.

(८) प्रस्तुत बाबीवर होणारा खर्च संबंधित संस्थांच्या "१० कंत्राटी सेवा" या उद्दिष्टांतर्गत अर्थसंकल्पित वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. सेवापुरवठादाराने त्यांचे देकार संस्थांना सादर केल्यानंतर किमान ४५ दिवसांत त्यांचे देयके अदा करण्यात येतील, याची दक्षता संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता घेतील.

(९) वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय अधिनस्त संस्थेतील कंत्राटी पदे बाह्यस्त्रोताकडून भरण्याकरीता तसेच सदर संस्थेत Mechanized Cleaning Service बाह्ययंत्रणेकडून उपलब्ध होण्याकरीता संचालनालयास्तरावर काढलेल्या निविदेतील अटी शर्ती विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १२९३८/२०२४, रिट याचिका क्र. १३६५५ व उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. ९१५०/२०२४ दाखल केली आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०३/१०/२०२४ रोजीच्या आदेशात " the tender process may continue, any work order if issued would be

subject to final outcome of the writ petition." असे आदेश दिले आहेत. तरी, संदर्भ क्र. ७ वरील दिनांक ०४.१०.२०२४ रोजीचा शासन निर्णय व या शासन निर्णयान्वये अनुक्रमे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी मनुष्यबळ व Mechanized Cleaning Service करीता दिलेली मान्यता मा. उच्च न्यायालय यांच्या उक्त आदेशाच्या अधीन असेल.

०४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उपविभाग-४, अनुक्रमांक -११, अनुसार निविदा अंतिम झाल्यानंतर निविदेनुसार येणाऱ्या वार्षिक खर्चास वित्तीय मान्यता घेणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१००९१११८०८९८१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=0477d837dc0b00fc2cbd45d17d07c625c3417378f97d493a8a277faa29f65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE95236B8A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2024.10.09 12:56:00 +05'30'

(म.गि. जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल-१/२, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
४. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
५. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय/ आयुर्वेद/ दंत/ होमिओपॅथी/ परिचर्या महाविद्यालय व रुग्णालय.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
८. उपसचिव (आयुष), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
९. निवडनस्ती (प्रशा-२)